Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

क्र.कोविम./माध्य.परीक्षा/ 1672
कोल्हापूर.416004.
दिनांक - 13/08/2024

प्रति,

1. मा.विभागीय माहिती उपसंचालक,
   माहिती उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर.
2. मा.जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,
   जिल्हा माहिती व प्रसिध्दी कार्यालय,
   सातारा / सांगली / कोल्हापूर.
3. मा.संचालक,
   आकाशवाणी केंद्र, सातारा / सांगली / कोल्हापूर.
4. मा.व्यवस्थापक,
   रेडिओ मिरची व टोमॅटो एफएम, कोल्हापूर.
5. मा.संचालक, बी.न्युज, कोल्हापूर.
6. मा.वृत्तपत्र संपादक,
   दै.पुढारी / सकाळ / तरुणभारत / लोकमत / लोकसत्ता / पुण्यनगरी / महाराष्ट्र टाईम्स / टाईम्स ऑफ इंडिया, सातारा / सांगली / कोल्हापूर.

विषय :- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रु./मार्च २०२५ परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट (अर्ज क्र.१७) होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नावनोंदणी प्रक्रियेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रु./मार्च २०२५ परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ट (अर्ज क्र.१७) होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन नांवनोंदणी अर्जाबाबतची कार्यवाही दिनांक १३/०८/२०२४ पासून सुरु करण्यात येत असून सदरील अर्ज मंडळाच्या संकेतस्थळावरुन भरावयाचे आहेत. नांवनोंदणी प्रक्रियेबाबतचे प्रकटन सोबत जोडले आहे. सदर प्रकटनास विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे–०४
## खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज
### • प्रकटन •

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं. १७ भरुन परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

इ. १०वी व इ. १२वी परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांकरिता सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालये मंडळाच्या अटी शर्तीनुसार नावनोंदणी करण्याकरिता उपलब्ध आहेत. यासंदर्भातील सर्व माहिती व मार्गदर्शक पुस्तिका मंडळाच्या **http://www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहेत. तसेच अधिक माहितीसाठी सर्व विद्यार्थी/शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या कार्यक्षेत्रातील विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

१ फेब्रु–मार्च २०२५ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत –

| अ.क्र. | तपशील | नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखा |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन अर्जाची प्रत (print out), ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे. | मंगळवार दि. १३/०८/२०२४ ते सोमवार दि. ३०/०९/२०२४ |
| २ | विद्यार्थ्यांनी विलंब शुल्काने नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन अर्जाची प्रत (print out), ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे. | मंगळवार दि. ०१/१०/२०२४ ते बुधवार दि. ३०/१०/२०२४ |

२ खाजगी विद्यार्थ्यांना इ. १०वी व इ. १२वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन (offline) अर्ज स्वीकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

३ खाजगी विद्यार्थ्यांनी इ. १०वी/१२वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन भरण्यापूर्वी ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातून मंडळाची परीक्षा दयावयाची आहे, त्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतांक, विषय योजना, माध्यम, शाखा(Stream) व इतर आवश्यक माहिती घेऊनच नोंदणी करावी.

४ नावनोंदणी अर्ज करतांना विद्यार्थ्यांनी **http://www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावरील Student Corner या option चा वापर करावा, अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजीमधून उपलब्ध आहेत, त्या वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी.

५ विद्यार्थ्याने अर्ज भरण्याकरिता १)शाळा सोडल्याचा दाखला(मूळ प्रत), नसल्यास द्वितीयप्रत व प्रतिज्ञापत्र २) आधारकार्ड ३) स्वत:चा पासपोर्ट आकारातील फोटो स्वत:जवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरतांना सदर मूळ कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत. काही कारणास्तव विद्यार्थ्यांकडे दुय्यम शाळा सोडल्याचा दाखला असेल तर त्याची मूळ प्रत जोडणे आवश्यक आहे.

६ कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलद्वारे कागदपत्रांचे फोटो (pdf) काढून ते upload करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई–मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे.

७ विद्यार्थ्यांनी अर्ज, ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे नावनोंदणी अर्जावर नमूद केलेल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात विहीत मुदतीत जमा करावयाची आहेत.

८ खाजगी विद्यार्थी नावनोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे —

इ.१०वी :— रु.१०००/— नाव नोंदणी शुल्क + रु.१००/— प्रक्रिया शुल्क(Processing Fee)

रु. १००/— विलंब शुल्क प्रति विद्यार्थी

इ.१२वी :— रु.६००/— नाव नोंदणी शुल्क + रु.१००/— प्रक्रिया शुल्क(Processing Fee)

रु. २५/— विलंब शुल्क प्रति विद्यार्थी

९ इ. १०वी/१२वी फेब्रु—मार्च २०२५ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी (फॉर्म नं. १७) नावनोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने (Debit Card/Credit Card/UPI/Net Banking द्वारे) भरणे अनिवार्य राहील. ऑनलाईन पध्दतीने शुल्क जमा केल्याबाबतची पोचपावती विद्यार्थ्याला/संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास त्यांच्या Login मध्ये प्राप्त होईल.

१० अ) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन पध्दतीने होणार असून नावनोंदणी करतांना विद्यार्थ्यांच्या सध्याच्या पत्त्यातील (Current Address) जिल्हा, तालुका व त्याने निवडलेल्या माध्यमानुसार, त्यास माध्यमिक शाळांची यादी दिसेल, त्यामधील एका माध्यमिक शाळेची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या माध्यमिक शाळेने परीक्षा अर्ज, प्रकल्प अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिक/तोंडी, श्रेणी विषय संदर्भातील कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन तसेच पुढील कार्यवाही करावयाची आहे.

ब) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन पध्दतीने होणार असून नावनोंदणी करतांना विद्यार्थ्यांच्या सध्याच्या पत्त्यातील (Current Address) जिल्हा, तालुका व त्याने निवडलेल्या माध्यम व शाखेनुसार (Stream), त्यास उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांची यादी दिसेल, त्यामधील एका उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने परीक्षा अर्ज, प्रकल्प अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिक/तोंडी, श्रेणी विषय संदर्भातील कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन तसेच पुढील कार्यवाही करावयाची आहे.

११ दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ट व्हावयाचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या प्राधिकृत केलेल्या रुग्णालयाच्या प्रमाणपत्र/UDID Card ची छायाप्रत प्रमाणित करुन अर्जासोबत सादर करावी व आवश्यकतेनुसार विभागीय मंडळ/माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी.

१२ महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामार्फत इ. ५वी किंवा इ. ८वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इ. १०वी साठी (१७ नं.) खाजगी विद्यार्थी म्हणून नावनोंदणी करता येईल.

१३ ऑनलाईन अर्ज भरतांना अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत Website वर दिलेल्या Helpline वर संपर्क साधावा.

१४ **पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) ऑनलाईन देण्यात येणार आहे, याची नोंद घ्यावी. तसेच पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे (Examination Form) मंडळाने विहीत केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक आहे.**

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे — ०४

दिनांक — १२/०८/२०२४